# आदरणीय अण्णासाहेब हजारे ह्यांस

संपूर्ण भारत देशात खऱ्या अर्थाने सर्वसामान्य जनतेला आपल्या अधिकाराची जाणीव करून देऊन हक्कांच्या प्राप्तीसाठी '' माहितीचा अधिकार कायदा - २००५ '' आणण्यासाठी पुढाकार घेतलेला **युगपुरूष** म्हणजे मा. अण्णासाहेब हजारे.

महाराष्ट्र राज्यातील नागरी सहकारी बँका व पतसंस्था या सेक्टरमध्ये आपण लक्ष दिले. महाराष्ट्र सरकार व सहकारातील सरकारी अधिकारी खडबडून जागे झाले. ७०० च्या दरम्यान नागरी सहकारी बँका व १८००० च्या दरम्यान नागरी सहकारी पतसंस्था तसेच ग्रामीण बिगरशेती नागरी सहकारी पतसंस्था यांमध्ये गेल्या २ वर्षांपासून **थकबाकी व ठेवीदारांच्या ठेवी** याबाबत वैचारीक मंथन देखील चालू झालेले आहे. वाटप केलेले कर्ज याबद्दल परत फेडीची क्षमता, नातेवाईकांना कर्ज वाटप याबद्दल सहकार खात्याकडून जोरदार मोहीम चालू करण्यात आली. झालेली थकबाकी ज्या कारणास्तव वसुल होत नाही, त्या कारणासाठी जबाबदार असणाऱ्यांवर तसेच थकबाकी वसुल न झाल्यामुळे ठेवी परत फेडीसाठी निधी अपुरा पडल्यामुळे अनेक वरील संस्थांवर मोठया प्रमाणात ठेवीदारांची नाराजी व प्रक्षोभ जनतेसमोर आला. परंतु या ठेवी ज्या कारणास्तव परत मिळत नाहीत त्यासाठी शासनाने संस्थांना त्यांचे अधिकार का प्रदान केले नाहीत याबाबत राज्यात कोणीही लक्ष घातले नाही.

सहकार कायद्याच्या कलम १०१ अन्वये प्राप्त झालेला **कर्ज थकबाकी वसुली दाखला** मिळविणेसाठी प्रत्येक स्तरावर संबंधितांनी कायद्याची पायमल्ली केली. कलम १०१ अंतर्गत दाखला मिळणेसाठी प्रति दाखला किमान ५०० रूपये राजरोसपणे या राज्यात संबंधितांनी दलांलांमार्फत संस्थांना अक्षरक्षः लुटले आणि अशा लुटमारी करून दिलेल्या दाखल्यांची कलम १५६ नुसार वसुली करण्याचे अधिकार ज्यांना सहकार खात्याने द्यायचे आहेत, त्यांच्या प्राप्तीसाठी देखील प्रत्येक संस्थेकडून दलांलामार्फत लाखो रूपये लुटण्यात आले. एवढ्यावर हे प्रकरण थांबले नाही तर, अशा मिळालेल्या वसुली दाखल्यांच्या आधारे **एस. आर. ओ.** ला पोलिस संरक्षण / मदत, शासन देऊ शकले नाही. याबाबत मा. अण्णासाहेब हजारे साहेब यांची संबंधितांनी अशरक्षः फसवणुक केली. आणि थकीत कर्ज कायद्याने वसुल करण्यास देखील अधिकाऱ्यांनी संस्थांना आवश्यक कायद्याला अधिन राहुन देखील, लुटमार करून देखील मदत केली नाही. किंबहुना संबंधितांनी आपली वैधानिक जबाबदारी पार पाडली नाही. आणि पर्यायाने शासकीय सेवा शर्तींचा भंग करून कर्तव्यात कसूर केली. आणि हे खुले आम पाप मा. अण्णासाहेब हजारे साहेबांनी खोलात जाऊन चव्हाट्यावर आणले नाही. किंबहुना त्या मुद्यापासून अधिकाऱ्यांनी मा. अण्णासाहेबांचे लक्ष दुसरीकडे पध्दतशीरपणे वळविले आणि बँका व पतसंस्थांना केवळ झोडपायचेच काम ह्या निमित्ताने राज्यात केले ही बाब चिंताजनक ठरली आहे.

**एस. आर. ओ.** यांनी जप्त केलेली मालमत्ता याची **अपसेट प्राईज ठरविण्याचे** अधिकार '' **एस. आर. ओ.**'' ह्यांना न देता अधिकाऱ्यांकडेच ठेवण्याची कायद्यातील तरतुद जाणीवपुर्वक बदलेली नाही. याचा दुष्परिणाम एस. आर. ओ. ने जप्त केलेल्या मालमत्तेच्या विक्री प्रकरणात अत्यंत वाईट आला आणि अपसेट प्राईज ठरविण्यासाठी

दाखल केलेल्या प्रस्तावावर शासकीय आधिकाऱ्यांनी आर्थिक मोबदला मिळण्यासाठीच सातत्याने वेळकाढूपणाचे धोरण स्विकारले. आणि त्याचे बळी मात्र बँका व पतसंस्था ठरल्या. पर्यायाने लुटमारीला प्रोत्साहन मिळाले. आणि थकीत रकमा वसुल न झाल्यामुळे अनेक संस्थांचे पदाधिकारी व संचालकांना ठेवीदारांच्या रकमा वेळेवर देता आल्या नाहीत. परिणामी मुदतपुर्व ठेवी मागण्यासाठी सुध्दा रांगा लागल्या. आणि चाललेल्या संस्था आर्थिक अडचणीत आल्या. परंतु ह्याच परिस्थितीची चाहूल मात्र मा. अण्णासाहेब हजारे साहेबांना अधिकाऱ्यांनी येऊ दिली नाही. ही बाब आमच्या दृष्टीने अत्यंत गंभीर आहे.

**ठेवी परत न देणे** हे वरील संस्थांमधील प्रमाण १० टक्के सुध्दा नाही. परंतु ९० टक्के बँका व पतसंस्थांच्या सेक्टरमध्ये बदनामी मात्र प्रिंट व इलेक्ट्रॉनिक मिडीयाच्या माध्यमातून पध्दतशीरपणे करण्यात आली. आणि अविश्वासाचे वातावरण ठेवीदारांमध्ये करून मूळ विषय व त्याची कारणे अलाहिदा बाजूला ठेवली. ठेवी व त्यावरील व्याज जर मागताक्षणी मिळाले नाही किंवा मुदत संपलेल्या ठेवी व त्यावरील व्याज मिळाले नाही तर, त्याची कारणे न शोधता सरसकट बँका व पतसंस्थांच्या संचालकांच्या विरूध्द संबंधित पोलिस ठाण्यात तसेच आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागाकडे ऑडीटर किंवा चौकशी अधिकारी किंवा शासनातर्फे **एफ. आय. आर. दाखल करण्यात आले**. वरील संस्थांच्या कार्यकर्त्यांना जेलमध्ये पाठविण्यात आले. परंतु हे काम करीत असताना त्यांचे मुळ न शोधता व त्यावर उपाय आहेत किंवा नाही यावर काहीही भाष्य न करता, वरिल सेक्टरवर भारतीय संविधानाचा भंग करुन **अन्यायाचा आसूड** संबंधितांनी उगारला. हे कटू सत्य मा. अण्णासाहेब हजारे साहेबांनी पहावयास हवे होते. परंतु दुर्दैवाने तशी कृती राज्यात अधिकाऱ्यांनी कुठेही केली नाही. परंतु चांगल्या चाललेल्या संस्थांच्या संदर्भात पध्दतशीरपणे केवळ लुटमारीसाठी व मा. अण्णासाहेबांची भिती दाखवून अशरक्षः सगळ्यांना वेठीस धरले .

मा. अण्णासाहेब हजारे साहेबांच्या यानिमित्त आम्ही हेही अत्यंत जाणीवपुर्वक लक्षात आणून देतो कि, **महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर** यांनी लिहलेल्या घटनेशी आपल्या राज्यत कशी खुले आम प्रतारणा होत आहे, हे खालील विष्लेषणावरून लक्षात येईल.

महाराष्ट्र राज्यात १७५ च्या दरम्यान सहकारी साखर कारख़ाने आहेत. या सहकारी साखर कारखान्यांच्या निर्मितीसाठी ९० टक्के शासनाच्या रकमा आहेत. महाराष्ट्र शासनाने स्वतः नाबार्डच्या पुर्व परवानगीने सहकारी साखर कारखान्यांना **वित्तीय संस्थांनी दिलेल्या कर्जाला थकहमी दिलेली आहे.** राज्यातील अनेक वित्तीय संस्थांनी शासनाची थकहमी घेऊन दिलेले हजारो करोडो रूपये कारखान्यांनी थकविले. परंतु कायद्याने दिलेली थकहमीची रक्कम **शासनाने त्या वित्तीय संस्थांनी मागणी करूनही दिलेली नाही**. शिवाय हे कारखाने केंद्रात व राज्याच्या मंत्रीमंडळात असणारे उच्चपदस्थ तसेच खासदार, आमदार व त्यांच्या नातेवाईकांचे व संबंधित राजकारण्यांचे आहेत. ह्याही पलीकडे अत्यंत भयानक म्हणजे राज्यातील या साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांच्या **ऊसाच्या बिलातून त्यांची वैयक्तिक लेखी संमती न घेता न परतीच्या कपाती केल्या.** तसेच ठेवीच्या रकमा परस्पर कापल्या. तद्नंतर अशा बेकायदेशीर केलेल्या कपातीच्या रकमा व ठेवीवरील रकमा व त्यावरील देय व्याज सुध्दा या साखर कारखान्यांनी शेतक-यांना वर्षोनुवर्षे दिले नाही. तसेच मुदत संपलेल्या वरील प्रकारच्या ठेवीसुध्दा वर्षोनुवर्षे या साखर कारखान्यांनी शेतक-यांना दिलेल्या नाहीत. ऑडीटर व साखर आयुक्त, सहकार

आयुक्त व सहकार सचिव हे सर्व उघडया डोळयांनी वर्षोनुवर्षे बघत आलेले आहेत.

मा. आण्णासाहेब हजारे साहेबांना हयाविषयी आमचे विनम्र निवेदन आहे की, साखर कारखान्याच्या ठेवी व त्यावरील व्याज शेतक–यांना वर्षोनुवर्षे न देणा–या **साखर कारखान्याच्या चेअरमन, व्हाईस चेअरमन, संचालक, एम्.डी. व अकांऊन्टट यांचेवर एफ्.आय.आर. का दाखल केले नाही ?** यासाठी राज्यातील लाखो शेतक–यांचे हजारो कोटी रुपयांच्या वर रकमा हे साखर कारखाने देत नाहीत. ऑडीटर, लेखापरिक्षण अहवालात संचालकांवर एफ्.आय.आर. दाखल करणेसाठी व तसेच सहकार कायद्याच्या कलम ८३, ७८, ८८ यासाठी शिफारस का करीत नाही ? शिवाय मा. साखर आयुक्त, याबाबत कारवाई करण्यास असमर्थ का ठरतात ? एवढेच नव्हेतर, मा. आण्णासाहेब हजारे साहेबांच्या **राळेगणसिध्दी या गावच्या आजूबाजूच्या** साखर कारखान्यात देखील हजारो शेतक–यांच्या करोडो रुपये ठेवींच्या रकमा, त्यावरील व्याज, वित्तीय संस्थांची करोडो रुपयाची थकीत कर्जे, कामगारांचे वेतन, भविष्य निर्वाह निधी, एम्.एस्.ई.बी. चे इलेक्ट्रीसीटी बिल इत्यादी सर्व बुडविले आहेत. मा. आण्णासाहेब हजारे साहेबांना हयाबाबत माहिती कशी नाही ? महाराष्ट्र राज्याच्या राळेगणसिध्दी पासून शेकडो किलो मीटर दूर असलेले गडचिरोली, कोल्हापूर, सांगली, पुणे, नागपूर, धुळे, नाशिक इ. जिल्हयातील नागरी बँका व पतसंस्थांबाबत ठेवीदार ठेवींच्या रकमा व त्यावरील व्याज त्याची मूळ कारणे न शोधता संबंधितांवर सरकारला कारवाई करण्यास भाग पाडले. मग राळेगणसिध्दी पासून केवळ ५ – १० कि. मी. अंतरावरील सहकारी साखर कारखान्यात ६० – ७० कोटी रुपये शेतक–यांचे, कामगारांचे, वित्तीय संस्थांचे, प्राइव्हेडंट फंडाचे व एम्.एस्.ई.बी. चे ज्यांनी डुबविले, त्यांचेबद्दल केवळ उदाहरण दाखल देखील आपले अस्त्र का उपसले नाही ? हयाबद्दल हया चळवळीतील अवघा महाराष्ट्र आश्चर्य चकीत आहे.

आम्हास याची पूर्ण कल्पना आहे की, मा. आण्णासाहेब हजारे हे ज्येष्ठ समाज सेवक, निस्वार्थी, निष्कलंक, व त्यागी गांधीवादी नेते आहेत. घटनेचे पूजक आहेत. आणि अशा परिस्थितीत **हि–या मोतीच्या खाणी ज्यांनी लुटल्या त्यांचेवर एफ्.आय. आर. दाखल करुन त्यांची प्रॉपर्टी विकून व त्यांची पदे घालवून** राज्यातील लाखो शेतक–यांना ज्या साखर कारखान्यांनी आतापर्यंत फसविले, ठेवी व त्यावरील व्याज दिले नाही, शिवाय वित्तीय संस्थांना देखील अडचणीत आणले, त्यांचेवर मा. आण्णासाहेब हजारे साहेब का आंदोलन करु शकले नाही ? उपोषणाची नोटीस याविषयासाठी का दिली नाही ? ही बाब अत्यंत संभ्रम तयार करणारी तसेच राज्यातील करोडो जनतेला, शेतक–यांना ज्यांनी नाडले त्यांनाचा पॅकेज, त्यांनाच सवलतीच्या दरात कर्जे, त्यांनाच मदत हा सर्व काय प्रकार आहे ? हयाबाबत मा. आण्णासाहेब हजारे साहेबांनी आतातरी त्वरीत आपला कार्यक्रम जाहीर करायला पाहीजे. मा. आण्णासाहेब हजारे साहेबांना आमचे हे निवेदन वजा हा अग्रलेख अर्पण करीत असताना, गेली १४ वर्षांपासून **श्री दिनेशचंद्र हुळावळे** नावाचे मुळ अहमदनगर जिल्हयातील एक कार्यकर्ते **''माळशेज रेल्वे होणेसाठी कार्यरत आहेत.''** कल्याण अहमदनगर ते बीड म्हणजेच **कोकण, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा यांना जोडणारा** '' माळशेज रेल्वे प्रकल्प '' व त्याच्या पुर्तीसाठी गेल्या १४ वर्षे केंद्र व राज्य सरकारला बजेटमध्ये तरतुद करण्यास देखील वेळ मिळू नये की ज्या या रेल्वे प्रकल्पामुळे किमान २ कोटी जनतेचे आर्थिक उत्थान होणेसाठी प्रचंड मदत होणार आहे. आणि किमान २०० किलोमीटर लांबीच्या किमान एक हजार कोटी रूपये खर्चातून हा माळशेज रेल्वे तयार होणे आवश्यक आहे. मा. अण्णासाहेब हजारे साहेबांना ह्याही निमित्तने विनंती की, आपण या माळशेज रेल्वे प्रकल्पाच्या पुर्तीसाठी श्री हुळावळे यांनी १४ वर्षांपुर्वी सातत्याने सभा, मेळावे, परिषदा, जन जागरण यात्रा, जाहीरनामे, नेत्यांच्या भेटीगाठी, दिल्ली वाऱ्या असे सारे प्रयत्न करुनही, प्रत्येक वर्षीच्या रेल्वे अर्थसंकल्पात माळशेज रेल्वे या प्रकाल्पासाठी वाटाण्याच्या अक्षता लावल्या. **या विभागातील जनतेने कोणाचे घोडे मारले आहे ?** सर्व नेते या माळशेज रेल्वेचे समर्थन करतात, शाबासकी देतात, स्तुती करतात. मग रेल्वे अर्थसंकल्पात

माळशेज रेल्वेसाठी गेले १४ वर्षात का तरतुद झाली नाही ? या प्रश्नाचे उत्तर काही असो. मा. अण्णासाहेब, आपण या जनतेच्या भावना त्यांच्या आर्थिक जिवनाशी निगडीत असल्यामुळे आपण केंद्र सरकार व महाराष्ट्र राज्य सरकारला निर्वाणीचा इशारा देऊन पुढाकार घेतला पाहिजे. आणि कै. बॅ. नाथ पै व मधु दंडवते यांनी ज्या कोकण रेल्वेची कोकण वासियांसाठी प्रयत्नांची शिकस्त केली, तद्वत माळशेज रेल्वे कृती समितीचे अध्यक्ष श्री दिनेशचंद्र हुलवळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी संकल्पीत केलेल्या व प्रत्येक दिवशी गेली १४ वर्षे याविषयासाठी पाठपुरावा केलेल्या योजनेचा आपण कळस बसवावा व करोडो जनतेचे आर्थिक भाग्य उजळावे ही विनंती.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!